**मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा सक्षम प्राधिकारी**
**यांचेसमोर**

( क्र.०५/ व्हिओसी/सुनावणी/२०२६/७३)

**माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार अपिल अर्ज**

माता नर्गिस दत्त कनिष्ठ महाविद्यालय देवणी.
ता.देवणी.जि.लातूर , ... अपिलार्थी
विरुध्द
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, ... प्रतिवादी
छत्रपती संभाजीनगर
श्री संजय कांतराव अंबुलगे रा .देवणी ता.देवणी.जि.लातूर ... सहप्रतिवादी

## प्रस्तावना

सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २३/०६/२०२५ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये प्राचार्य, माता नर्गिस दत्त कनिष्ठ महाविद्यालय, देवणी या संस्थेत अनुदानित तत्वावर सुरु असणाऱ्या १. बँकीग फायनान्शियल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स २. लॉजिस्टीक सप्लाय चेन मॅनेजमेंट ३. अकाऊटींग अँड ऑफीस मॅनेजमेंट या तीनही उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांची मान्यता काढून घेण्यांत आली आहे.

माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ मध्ये शाळेची मान्यता अंशत: काढून घेतलेली असेल त्या शाळेच्या व्यवस्थापनास उक्त आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संचालकांकडे अपिल दाखल करता येईल असे नमूद केल्याप्रमाणे संस्थेने संचालनालयास दि. ०९/०७/२०२५ रोजी अपिल केले होते. या अपिल अर्जाच्या अनुषंगाने संबंधित शिक्षण संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे समोर दि.०६ ऑगस्ट , २०२५ रोजी दुपारी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

## पूर्वपीठिका

१. श्री. संजय कांतराव अंबुलगे, तक्रारदार यांनी माता नर्गिस दत्त कनिष्ठ महाविद्यालय, देवणी, ता.देवणी, जि. लातूर येथील व्यवसाय शिक्षण विभागातील एच.एस.सी. व्होकेशनल/एम.सी.व्ही.सी गैर कारभाराची चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही करणेबाबतचा तक्रार अर्जानुसार प्रादेशिक कार्यालय यांनी चौकशी बाबतची कार्यवाही करून सदर संस्थेची मान्यता रद्द केली. सदर आदेशाबाबत संस्थेचा अपिल अर्ज संचालनालयास प्राप्त झाला.

२. संचालनालयाच्या दिनांक १३/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रा.का. छत्रपती संभाजीनगर यांना श्री. संजय कांतराव अंबुलगे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उचित शासन नियमानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अहवाल अभिप्रायासह संचालनालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने सहसंचालक, प्रा. का. छत्रपती संभाजीनगर यांच्या सूचनेनुसार जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर यांचे स्तरावर पाच सदस्यीय समिती गठीत करण्यांत आली. सदर समितीने संस्थेत जाऊन त्याबाबतचा खालीलप्रमाणे तपशिलवार अहवाल प्रादेशिक कार्यालयास सादर केला आहे.

१. संस्थेत मानकाप्रमाणे आवश्यक असणारी जागा / वर्गखोल्या / कार्यशाळा पुरेशा प्रमाणात नाही.

२. संस्थेत पुरेशा प्रमाणात भौतिक सुविधा उपलब्ध नाहीत.

३. संस्थेत मानकाप्रमाणे प्रशिक्षणासाठी पुरेशा प्रमाणात साहित्य उपलब्ध नाही.

४. संस्थेत प्रशिक्षणार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

५. संस्थेतील कर्मचारी नियमित उपस्थित रहात असल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते.

६.संस्थेतील लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती आदेश देण्यांत आलेले असून सद्यस्थितीत दोन्ही कर्मचारी कार्यरत आहेत.

## सुनावणी

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०४/०८/२०२५ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक २९/०७/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले होते. तथापि, दिनांक ०४/०८/२०२५ रोजी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी त्यांचे दिनांक पत्र दिनांक २९/०७/२०२५ अन्वये पंडित दिनदयाल उपाध्याय , एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीची बैठक असल्याने सुनावणीसाठी हजर रहाता येणार नसल्याचे संचालनालयास कळविले होते. त्यामुळे सदर सुनावणी रद्द करण्यात आली.त्यानंतर सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०६/०८/२०२५ रोजी आयोजित केल्याबाबत संचालनालयाच्या दिनांक ०१/०८/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे संस्थेस कळविण्यात आले,असून, संस्थेची अंतिम सुनावणी दिनांक ०६ ऑगस्ट २०२५ रोजी मा. संचालक यांचे समोर घेण्यात आली.

३. **सुनावणीस खालील अधिकारी/प्रतिनिधी उपस्थित होते :**

- श्रीमती सुजाता सोमण, कार्यालयीन अधीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय, मुंबई
- श्री. पी.जे.औताडे , जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर
- श्री.ए.पी.शिंदे, उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
- प्रतिवादी संस्थेच्या वतीने अध्यक्ष श्री.नागनाथ विरप्पा जिवणे.

अर्जदार यांनी दिनांक ०६/०८/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान त्यांची संस्था सन १९९७ पासून सुरू असल्याने संस्थेला दि.१०/०५/२०१८ रोजीचा शासन निर्णय लागू होत नाही,असा युक्तिवाद केला. सबब मा.संचालक यांनी सन १९९७ चे मान्यता प्रदान करतानाचे निकष कोणते होते व ते निकष संस्था पूर्ण करीत असल्याबाबतचे संस्थेचे म्हणणे व सहप्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दि.१३/०८/२०२५ पर्यंत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, लातूर यांना सादर करावे व प्रादेशिक कार्यालय संभाजीनगर यांनी त्यांच्या अभिप्रायासह संचालनालयास सादर करावे असे निर्देश दिले.

## अपिलार्थी यांचा युक्तिवाद

अपिलार्थीनी नमूद केले की :

तक्रारदार श्री संजय कांतराव अंबुलगे हे सदर अभ्यासक्रमांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे पालक नसुन संस्थेशी त्याचा काहीच संबंध नाही. श्री.अंबुलगे संस्थेच्या कर्मचाऱ्याकडून खंडणीची वारंवार मागणी करीत होते. कर्मचाऱ्यांनी त्याची खंडणी मागणीची पूर्तता न केल्याने आकासपोटी तक्रार दिली आहे. संस्थेकडे एकही अभ्यासक्रम टेकनिकल विभागाचा नाही. संस्थेकडे वाणिज्य विभागाचे टेबल अभ्यासक्रम आहेत. त्यासाठी मानकाप्रमाणे इमारत व साधनसामुग्री उपलब्ध आहे.

माध्यमिक विभागाची पक्की बांधलेली इमारत दि. ०५.०६.२०२५ पासून M.C.V.C. अभ्यासक्रमासाठी देण्यात आली. माध्यमिक शाळा चालू होण्यास वेळ असल्याने माध्यमिकचे वर्ग खोल्या नंतर बांधुन माध्यमिक विभागास दिले आहेत. सोबत इमारतीच्या वर्ग खोल्याचे फोटो जोडले आहेत .

गणवीर समितीने काढलेल्या त्रुटया वाणिज्य Table कोर्सला लागू नाहीत त्याची पूर्तता नाही म्हणून संस्थेकडील उपलब्ध कागदपत्र त्रुटी पुर्तता पुरावे न स्विकारता दि. १६.०६.२०२५ पर्यंत हस्तपोच सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले. त्याअनुषंगाने दि. १३.०६.२०२५ रोजी अहवाल सादर करण्यात आले होते. सदर अहवालानुसार संस्थेने दिलेले पुरावे राजुरकर समितीने विचारात घेतले नाहीत.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय छ. संभाजीनगर यांनी प्रथम दि. १७.०६.२०२५ च्या आदेशान्वये इयत्ता ११ वी प्रवेशास प्रतिबंध केले व इ. १२ वी चे विद्यार्थी कॉलेजपासून २० किमी अंतरावर समायोजन करण्यात आले व नंतर दि. २३.०६.२०२५ च्या आदेशान्वये विद्यार्थी समायोजनानंतर कॉलेजची मान्यता काढून घेण्यात आल्याचे आदेश पारीत करण्यात आले हे संस्थेस मान्य नसून संचालक स्तरावर वाणिज्य Table कोर्सचे तज्ञाची समिती नेमून निरीक्षण करण्यास हरकत नाही.

संस्थेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व कर्मचाऱ्यास इतर संस्थेमध्ये रूजू करून घेत नसल्याने त्यांची व त्यांच्या कुटूंबाची उपासमार थांबविण्याच्या दृष्टीने परत आपल्या स्तरावर पुनःश्च मान्यता शाळा संहीता ७.५ अन्वये प्रदान करावे व संस्थेस विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे कार्य करण्यास संधी देणेबाबत विनंती केली आहे.

**प्रतिवादी यांचा युक्तिवाद**

**प्रतिवादी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी नमूद केले की**

वर नमूद केल्यानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी खालील प्रमाणे अहवाल सादर केला.

१.१९९७ च्या मानकानुसार ८२% यंत्रसामुग्री आहे परंतु त्यापैकी ९०% यंत्रसामुग्री बंद आवस्थेत आहे. खरेदी देयक उपलब्ध नाही व जडसंग्रह नोंदवही उपलब्ध नाही.तसेच मानकानुसार जागा व भैतिक सुविधा उपलब्ध नाहीत.

२. शासन निर्णय क्रमांक व्हीओसी-२०१५/प्र.क्र.९६/व्यशि-४/ दि. २७ नोव्हेंबर २०१५ नुसार +२ स्तरावरील (इ.११ वी व इ.१२वी) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम पुर्नरचीत करुन राज्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्यासाठी नवीन सुधारित मानकांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर सुधारित मानका प्रमाणे व्यवसाय अभ्यासक्रम राबवणे नविन व पुर्वीच्या मान्यता असलेल्या संस्थांना बंधकारक आहे. सबब शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार सदर संस्थेकडे भौतिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे संबधीत संस्थेची मान्यता रदद करण्यांत आलेली आहे.

**सहप्रतिवादी यांचा युक्तिवाद**

**सहप्रतिवादी संजय कांतराव अंबलगे रा. देवणी, यांनी नमूद केले की,**

संबंधीत नर्गीस दत्त महिला कनिष्ठ महाविद्यालय- व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम अनुक्रमे १) ५ बँकिंग फायनान्शियल सर्व्हसेस अँण्ड इन्शुरन्स २) लॉजिस्टीक सप्लाय चेन मॅनेजमेंट व ३) अकाऊटींग अँण्ड ऑफीस मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांस मान्यता मिळून गेली २५ ते २७ वर्ष झाली आहेत. सदरील महाविद्यालय अस्तित्वात नव्हते केवळ कागदोपत्री विद्यार्थी प्रवेश व परिक्षा घेण्यात येत होती. याची मी पोलखोल करून घरी बसुन पगार उचलणाऱ्या शिक्षक, निदेषक व लिपीक हमाल यांनी लाखो रूपये दर महिना उचलुन २५ वर्षामध्ये किमान २० कोटी पेक्षा जास्त केवळ कागदोपत्री बोगस पगार वेतन देयके दाखल करून महाराष्ट्र शासनास फसविलेले आहे. नर्गीस दत्त कनिष्ठ महाविद्यालय (व्यवसाय अभ्यासक्रम) हे अस्तित्वातच नाही.

तरी आपणास नम्र विनंती की, मा. सहसंचालक छ. संभाजीनगर यांनी या संस्थेची जी मान्यता काढली आहे. ती कायम ठेवण्यात यावी. अन्यथा माझे अंदोलन असेच चालु राहील.

## निष्कर्ष

अर्जदार,प्रतिवादी व सहप्रतिवादी यांचे म्हणणे यांचा विचार करून निष्कर्ष खालील प्रमाणे :

१. सदर अपिल अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी समाधानकारक स्वरूपात सिद्ध झालेल्या नाहीत. संस्थेतील त्रुटी गंभीर स्वरूपाच्या असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास बाधक आहेत.

२. संस्थेत मानकाप्रमाणे आवश्यक असणारी जागा / वर्गखोल्या / कार्यशाळा पुरेशा प्रमाणात नसल्याचे निर्दनास येत आहे .

३. सबब सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २३/०६/२०२५ रोजी दिलेला आदेश योग्य, कायदेशीर व न्याय्य असल्याचे दिसून येते.

४. सदर अभ्यासक्रमात प्रामुख्याने मानकाप्रमाणे विद्युतभार व यंत्रसामुग्रीची त्रुटी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येत आहे.

५. **वरील बाबींचा साकल्याने विचार करता सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभजीनगर यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसून येत आहे.**

उपरोक्त बाबी लक्षात घेता माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार संचालक हे संस्थांच्या अपिलाच्या अर्जावर निर्णय देण्यास सक्षम प्राधिकारी असल्याने सदर संस्थेच्या अपिल अर्जावर खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

१) माता नर्गिस दत्त कनिष्ठ महाविद्यालय, देवणी या संस्थेतील अनुदानित तत्वावर सुरु असणाऱ्या १. बँकीग फायनान्शियल सर्व्हसेस अँड इन्शुरन्स २. लॉजिस्टीक सप्लाय चेन मॅनेजमेंट ३. अकाऊटींग अँड ऑफीस मॅनेजमेंट या तीनही उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांची अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्याबाबत सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांनी दि.२३ जून, २०२५ रोजी दिलेले आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

२) **संस्थेने जर मान्यता काढून घेण्यात आलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेश केले तर त्यांचेवर** महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्याकरीता व तत्संबधित किंवा तद्अनुषांगिक बाबीकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

३) **माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील नियम ०७ मधील ७.५ नुसार सदर आदेश हे अंतिम राहील व व्यवस्थापनावर बंधनकारक राहील.**

४) प्रस्तुत निर्णयाची माहिती सर्व संबंधितांना कळविण्यात यावी.

(माधवी सरदेशमुख)(भा.प्र.से)

संचालक

स्थळ - मुंबई

दिनांक - २७/०२/२०२६

प्रत माहितीकरिता -

१) सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशि. प्रा.का. छ. संभाजीनगर

२) जि. व्य. शि. व. प्रशि. अधिकारी, जि. व्य. शि. व प्रशि. कार्या. लातुर.

३) माता नर्गिस दत्त कनिष्ठ महाविद्यालय देवणी. ता. देवणी. जि. लातुर (जि. व्य. शि. व